'आयपॅड'वर मराठी पुस्तक - यशवंत देव आणि मंदार जोगळेकर



# पुस्तक आयपॅडवर टाका, खिशात ठेवा !

'इ-बुक्स' आणि ऑनलाईन खरेदी-विक्रीतून
मराठी पुस्तके जगभरात पोचवणाऱ्या
'बुकगंगा'चे प्रवर्तक **मंदार जोगळेकर** यांच्याशी संवाद

मुलाखत : **पराग पोतदार**

**इंटरनेटच्या महाजालामध्ये वेगाने पसरणारी 'इ-बुक' ही संकल्पना नक्की काय आहे?**

इ-बुक म्हणजे केवळ इंटरनेटवर पाहायला-वाचायला मिळणारे पुस्तक इतका मर्यादित अर्थ नाही, तर प्रत्यक्ष पुस्तक वाचताना जो अनुभव वाचक घेत असतो, तसाच किंबहुना त्यापेक्षा अधिक चांगला अनुभव मिळवून देणे म्हणजे खरे तर इ-बुक ही संकल्पना आहे. परंतु इ-बुक म्हणजे पीडीएफ फाईल असा एक आपल्याकडे मोठा गैरसमज होता. त्यामुळे इ-बुकच्या माध्यमातून इंटरनेटवर असलेल्या पुस्तकाची कुणीही कॉपी करून त्याची सहज पायरसी होऊ शकायची. साधारणतः गेल्या तीन ते पाच वर्षांमध्ये इ-बुक ही संकल्पना आपल्याकडे जास्त रुजायला लागली.

**वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी 'इ-माध्यम' खरोखर उपयुक्त ठरेल असे वाटते?**

निश्चितपणे. किंबहुना याची सुरुवात झालीही आहे. आज इंटरनेटवर वृत्तपत्रांच्या इंटरनेट आवृत्ती वाचणाऱ्यांची संख्या कमी नाही. याचेच पुढचे पाऊल इ-बुकचे वाचन असणार आहे. पुण्यात अप्पा बळवंत चौकातील एखाद्या पुस्तकाच्या दुकानात गेल्यानंतर ज्याप्रमाणे अनेक पुस्तके चाळून आणि त्यातून मग आवडेल त्या पुस्तकाची निवड करू अगदी तश्शीच सुविधा प्रगत तंत्रज्ञानाने आता इंटरनेटवर उपलब्ध झाली आहे. पुस्तकाचे कव्हर, त्याचे मुद्रक-प्रकाशक यांची नावे, त्याची किंमत इतपत मर्यादित न राहता आता प्रत्यक्ष पुस्तकातील काही पानांचा 'ट्रेलर' आपल्याला इंटरनेटवर वाचायला मिळू शकतो व त्यातून आपल्याला आवडणाऱ्या पुस्तकांची निवड करता येऊ शकते. केवळ इंटरनेटवर पुस्तक वाचता येणे ही सुविधा होती; आता त्याही पुढे एक पाऊल टाकून दृक्-श्राव्य एकत्रित अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. ही इ-बुकमधील नवी क्रांती आहे ! पुस्तक जास्तीत जास्त 'इंटरॅक्टिव्ह' व्हावे हा त्यामागील उद्देश आहे. उदाहरणार्थ एखाद्या कवीची कविता त्याच्याच आवाजात ऐकवण्याची, तसेच त्या विषयावर लेखक-कवीने दिलेली एखादी मुलाखत दृक्श्राव्य स्वरूपात आता ऐकता-पाहता येणार आहे !

**इ-बुक ही संकल्पना महाराष्ट्रातील मराठी वाचकांच्या पचनी पडते आहे?**

अमेरिकेत 'ॲमेझॉन डॉट कॉम' या संकेतस्थळावर लाखो इंग्रजी पुस्तके मिळतात. अमेरिकेत मोठा वाचकवर्ग या इ-बुकच्या माध्यमातून जोडला गेलेला आहे. अमेरिकेत जर १०० पुस्तके छापली जात असतील, तर त्यातील ८० पुस्तके ही इ-बुक स्वरूपात असतात. भारतात ही स्थिती येण्यासाठी आणखी तीन ते पाच वर्षांचा कालावधी लागेल. परंतु त्याची सुरुवात झाली आहे. त्या धर्तीवर भारतीय भाषांतील, विशेषतः मराठी भाषांतील पुस्तके एकाच ठिकाणी मिळण्यासाठी महाराष्ट्रात आता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू झाले आहेत. ही सुरुवात असली तरीही त्याला मराठी वाचकांचा मिळणारा प्रतिसाद अतिशय चांगला आहे. इंटरनेटचा प्रसार वेगाने होत आहे. संगणकाविषयी जागरूकता वाढत आहे. कमी किमतीत संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध होत आहेत. ग्रामीण भागात त्यांचा प्रसार होत आहे. शहरातील अनेक ग्रंथालयांनी बदलत्या युगाची पावले ओळखून 'डिजिटलायझेशन'चे काम हाती घेतले आहे. ज्या वेगाने हे सारे बदल होत आहेत ते पाहता येणारा काळ हा इ-वाचनाचाच असणार आहे !

**इ-बुक संकल्पनेचा प्रसार झाल्याने मराठी प्रकाशकांचे नुकसान होण्याची भीती नाही का?**

- अजिबात नाही. इ-बुक माध्यमातून मराठी प्रकाशकांना एक नवीन बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. त्यासाठी आता प्रमुख मराठी प्रकाशकांशी सहकार्य करार करून त्यांची पुस्तके अधिकृतपणे संकेतस्थळावर प्रकाशित केली जात आहेत. इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर बुकिंग करणाऱ्यांना सवलती, गिफ्ट कूपन्स या नव्या प्रकारांतून त्याचा अधिक प्रसारही केला जात आहे. प्रकाशक आणि वाचक यांच्यातील एक दुवा म्हणून इ-बुक संकेतस्थळे येणाऱ्या काळात काम करतील. तसेच पुस्तकांच्या किमती वाढवून व्यवसाय वाढवण्यापेक्षा संख्यात्मक विस्तार आणि नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार ही अपरिहार्य अशी बाब आहे हे हळूहळू प्रकाशकांच्याही ध्यानी येत जाईल.

**मराठी पुस्तकांच्या ऑनलाईन खरेदी-विक्रीला मिळणारा प्रतिसाद कसा आहे?**

मराठी वाचक हा चोखंदळ आहे. त्यामुळे त्याला आकर्षित करू शकेल अशा रीतीने या सर्व पुस्तकांची रचना करावी लागते. www.bookganga.com या आम्ही विकसित केलेल्या संकेतस्थळावर अगदी नवख्यात नवख्या संगणकसाक्षरालासुद्धा सहजतेने संकेतस्थळावर फिरता यावे, हवी ती माहिती घेता यावी, आवडणारे पुस्तक चाळायला मिळावे, उत्तमोत्तम व बाजारात येणारे प्रत्येक नवीन पुस्तक त्याला इंटरनेटवर पाहायला मिळावे असा प्रयत्न असतो. त्याचप्रमाणे त्याला आवडलेले पुस्तक खरेदी करायचे असेल तर इंटरनेटवरील नेटबँकिंगचे सर्व पर्याय खुले ठेवावे लागतात. नेटबँकिंग, रेल्वे व विमान तिकीट बुकिंग ऑनलाईन करण्यास आता सर्रास सुरुवात झालेली दिसते. भारतातील बँकिंग हे अन्य राष्ट्रांपेक्षा अधिक प्रगत आहे. कोअर बँकिंगमुळे सर्व प्रमुख बँका व आंतरशाखा एकमेकांशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे आपल्याकडे नेटबँकिंग लवकर रुजते आहे. ऑनलाईन शॉपिंगकडेही महाराष्ट्रातील लोकांचा कल वाढतो आहे. कमी किमतीमुळे इ-बुकच्या माध्यमातून ऑनलाईन पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेला 'रिस्क फॅक्टर' तुलनेने कमी आहे. वाचकाला ऑनलाईन खरेदी करणे अतिशय सोपे जावे यासाठी क्रेडिट-डेबिट कार्डानि पैसे देण्याची सुविधा आहेच; पण त्याचबरोबर बँकेच्या खात्यावर पैसे जमा करणे, चेक-डीडी पाठवणे अशा सर्व सुविधा देण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्रातील वाचकांची पारंपरिक मानसिकता लक्षात घेऊन 'प्रिंट कॉपी' घरपोच देण्यासही सुरुवात झाली आहे. इतकेच नव्हे इंटरनेटवर पुस्तके पाहून फोनवर ऑर्डर देण्याचीही सुविधा आता आम्ही सुरू करीत आहोत.

**वाचनसंस्कृती लोप पावतेय अशी ओरड अनेकांकडून होताना दिसते. अशा स्थितीत इ-बुकसारख्या संकल्पनेतून ही वाचनसंस्कृती पुन्हा वृद्धिंगत व्हायला मदत होईल का?**

- वाचनसंस्कृती लोप पावतेय हे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. कारण वाचनसंस्कृती वाढतेच आहे फक्त त्याची माध्यमे आता बदलताहेत. हा बदल आपण लक्षात घ्यायला हवा. त्याचा उपयोग वाचकांप्रमाणेच लेखक-प्रकाशकांनीही करायला हवा. या सर्व नव्या बदलांकडे सकारात्मक दृष्टीने बघायला हवे. नवे तंत्रज्ञान अवगत करून आपला विकास करणे महत्त्वाचे आहे. त्याच्याकडे पाहून नाके मुरडून काय साधणार? अशा नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वाचनापासून काहीशा दूर जाणाऱ्या तरुण पिढीपर्यंत पोहोचता आले तर वाचनसंस्कृतीचा निश्चितपणे आणखी प्रसार होईल.

**मराठी भाषा जतन आणि संवर्धन करण्यात तंत्रज्ञानाची भूमिका कशी महत्त्वाची ठरेल? नव्या तंत्रज्ञानाविषयी असणाऱ्या एका अनामिक भीतीचे ओझे कसे दूर होईल?**

मराठी साहित्य हा एक अमूल्य असा ठेवा आहे. त्याचे जतन होणेही गरजेचे आहे. नव्या पिढीजवळ तंत्रज्ञान वेगाने पोहोचते आहे. त्यामुळे भाषेचे संवर्धन होण्यासाठी इ-बुकसारख्या माध्यमातून आपण जितक्या वेगाने त्याच्याजवळ पोहोचू तितकी भाषा टिकेल आणि वाढेल. दहा वर्षांपूर्वी आपल्या आई-वडिलांच्या हातात मोबाईल दिला तर त्याची भीती वाटायची. आपल्याला ते परवडेल का असाही प्रश्न पडत असे. पण मोबाईलमध्ये गेल्या दहा वर्षांत जी क्रांती झाली तीच क्रांती पुढील दहा वर्षांत इ-बुकच्या बाबतीत होणार आहे. मोबाईलची भीती नाहीशी झाली तसेच इ-बुक रीडरच्या बाबतीत ते होणार आहे.

तंत्रज्ञानामुळे आपल्या मानसिकतेत व जीवनशैलीतही झपाट्याने बदल होत जाणार आहेत. शाळांमध्येही मुले आज पाट्या वापरतात ते चित्र बदलून 'इलेक्ट्रॉनिक पाट्या' सर्रासपणे वापरल्या जाणार आहेत. इ-बुक सुविधाही वाचकांच्या अंगवळणी पडून त्याचा वेगाने प्रसार होणार आहे. त्याचप्रमाणे एका संगणकावर वा आयपॅडवर एका वेळी हजारो पुस्तके संग्राह्य राहू शकत असल्याने तुमच्या सोबत तुमचे 'डिजिटल ग्रंथालय' असणार आहे. हव्या त्यावेळी हवे ते पुस्तक वाचण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. सध्या येऊ घातलेली इ-बुक संकल्पना ही नुकती कुठे सुरुवात आहे. येत्या दहा वर्षांत कल्पनेच्या पलीकडे त्याचा वापर सुरू झालेला असेल. त्यातून मराठी वाचनसंस्कृती नक्की विकसित होईल. त्याचा अधिकाधिक विस्तार होत जाईल. इ-क्रांती माय मराठीसाठी उपकारकच ठरेल, यात शंका नाही.

संकेतस्थळ : www.bookganga.com
इ-मेल : mandar@bookganga.com